# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी

यांचे कार्यालय,२ रा मजला,रेव्हियुन्यु डिपा.सो.इमारत,कलेक्टर ऑफीस आवार,रत्नागिरी,

जा.क्र सनिर/लांजेकरनगरसहगृहसं/कलम७७(अ)/२०१८
दिनांक ३०.०१.२०१८

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी मंडळाच्या नियुक्तीचा आदेश

वाचा - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)

वाचले – १.संस्था लेखनिक, लांजेकरनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.उदयमनगर,रत्नागिरी,ता.जि.रत्नागिरी यांचेकडील दि.०२.०१.२०१८ रोजीचे पत्रासोबत संचालक मंडळ सदस्य यांचे राजीनामा पत्र.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदीनुसार लांजेकरनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.उदयमनगर,रत्नागिरी,ता.जि.रत्नागिरी या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे तरतुदीनुसार झाली असून तीचा नोंदणी क्रमांक आरटीजी/(आरटीजी)/एचासजी/(टीसी)/१९३०/२०१०/११,सन २०१० असा आहे. यापुढे सदर संस्थेचा उल्लेख उक्त संस्था असा करण्यात आला आहे. आणि,

ज्याअर्थी संस्थेच्या एकूण संचालक मंडळाची संख्या ११ असून त्यापैकी ०९ सदस्य सध्या संचालक मंडळ सदस्य म्हणून कार्यरत आहेत ,त्यापैकी ०६ सदस्यांनी संस्थेचे कामकाज करण्यास इच्छुक नसल्याने त्यांनी पदाधिकारी पदाचा राजीनामा व संस्था संचालक मंडळ सदस्यत्वाचा राजीनामा अध्यक्ष यांचेकडे दिलेला आहे व संस्था अध्यक्ष यांनी आपला राजीनामा संस्था सचिव यांचेकडे दिलेला आहे.संस्था लेखनिक यांनी संस्थेच्या दि.०२.०१.२०१८ रोजीच्या पत्राने सदरचे ६ राजीनामे या कार्यालयास सादर केलेले असून समितीने आपले कामकाज करणे थांबविले आहे. त्यामुळे व्यवस्थापक समिती अल्पमतात आली असून व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झाली आहे. आणि त्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीतरित्या चालू राहणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये संस्थेवर प्राधिकृत अधिकारी मंडळ नेमणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी,मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये, मला प्राप्त अधिकारानुसार मी एस.डी.तोडणकर,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,रत्नागिरी. आदेश देतो की, लांजेकरनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.उदयमनगर,रत्नागिरी,ता.जि.रत्नागिरी या संस्थेच्या समिती सदस्यांनी आपले पदाचे राजीनामे दिले असून कामकाज करणे थांबविले आहे. त्यामुळे व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झाली आहे. या कारणास्तव संस्थेवर ६ महिने मुदतीकरता पुढीलप्रमाणे प्राधिकृत अधिकारी मंडळाची नियुक्ती करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १.श्री. रिजवान दाऊद शेखासन. | प्राधिकृत मंडळ प्रमुख |
| २.श्री. अजिज लतिफ पठाण. | प्राधिकृत मंडळ सदस्य |
| ३.श्रीम.सबीहा नूरमहंमद सुवर्णदुर्गकर | प्राधिकृत मंडळ सदस्य |
| ४.श्रीम.शेहनाज नजीर खा . | प्राधिकृत मंडळ सदस्य |

वरील प्राधिकृत अधिकारी यांनी नवीन समितीच्या निवडणूकीची व्यवस्था करून संस्थेचा ताबा नवीन समितीकडे सोपविण्याची कार्यवाही करावी अथवा संस्थेच्या हिताचे दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी.सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ३०.०१.२०१८ रोजी दिला असे.

स्थळ - रत्नागिरी

दिनांक - ३०.०१.२०१८

(एस.डी.तोडणकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,रत्नागिरी.

प्रत - **माहितीसाठी व योऽ! त्या उचित कार्यवाहीसाठी रवाना.**

१.श्री. रिजवान दाऊद शेखासन. — प्राधिकृत मंडळ प्रमुख
२.श्री. अजिज लतिफ पठाण. — प्राधिकृत मंडळ सदस्य
३.श्रीम.सबीहा नूरमहंमद सुवर्णदुर्गकर — प्राधिकृत मंडळ सदस्य
४.श्रीम.शेहनाज नजीर खान — प्राधिकृत मंडळ सदस्य

२/- त्यांनी उक्त संस्थेच्या दप्तराचा व जायदादीचा रितसर ताबा घेउन दैनंदिन कामकाज सांभाळावे व तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.तसेच प्राधिकृत अधिकारी कालावधीत संस्थेची निवडणूक घेवून नवनिर्वाचित समितीकडे संस्थेचे कामकाज सुपूर्त करावयाचे आहे.

प्रत माहितीसाठी-

१.माजी चेअरमन/सचिव, नांजेकरनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.उदयमनगर,रत्नागिरी,ता.जि.रत्नागिरी

२/- यांनी संस्थेच्या दप्तराचा व जायदादीचा ताबा प्राधिकृत अधिकारी मंडळ यांचेकडे त्वरीत सुपूर्त करावा.

२.मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,रत्नागिरी

३.मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था रत्नागिरी यांना सविनय सादर

४.मा.शाखाधिकारी रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., रत्नागिरी शाखा माळनाका,रत्नागिरी.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,रत्नागिरी.